**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०३ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **वक्फ सुधारणा विधेयकयावर राज्यसभेत चर्चा सुरु; लोकसभेत काल २८८ विरुद्ध २३२ मताधिक्यानं हे विधेयक झाल मंजूर.**
2. **भारतातून आयात होणाऱ्या मालावर २६ टक्के शुल्क आकारण्याची अमेरिकेची घोषणा; मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ८०० अंकांनी कोसळला.**
3. **नागपूर जिल्ह्यातील रामटेक गड मंदिरात ६३५ मीटर लांबीच्या रोपवेच्या कामासाठी १५१ कोटी रुपयांच्या निधीची मंजुरी - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माहिती.**

**आणि**

4. **नागपूरसह भंडारा, बुलडाणा येथे अवकाळी पावसाची हजेरी; भंडाऱ्यात वीज पडून 2 जणांचा मृत्यू.**

**आता सविस्तर बातम्या** .......

वक्फ चर्चा

वक्फ सुधारणा विधेयकावर राज्यसभेत चर्चा सुरू आहे. संयुक्त संसदीय समितीत सखोल चर्चा केल्यानंतरच हे विधेयक आणण्यात आल्याचं अल्पसंख्यक कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी विधेयक मांडताना सांगितलं. वक्फच्या मालमत्तेत मुस्लिमेतर व्यक्ती हस्तक्षेप करणार नाही, याचा लाभ केवळ मुस्लिम व्यक्तींनाच मिळेल, असं रिजीजू यांनी स्पष्ट केलं. या विधेयकाचा हेतू वक्फ मालमत्तांचं व्यवस्थापन करणं असून मुस्लिमांच्या धार्माचरणात हस्तक्षेप करण्याचा नाही. भूमी हा राज्य सरकारच्या अखत्यारीतला विषय असून, यासंदर्भातले अधिकार त्यांच्याकडेच राहणार असंही त्यांनी सांगितलं.......

***(होल्ड बाईट - किरेन रिजेजू 41 सेकंद)***

***जो वर्क प्रॉपर्टी ऑलरेडी रजिस्टर्ड है, जो सेटल्ड केस है, हम उसको रेट्रोस्पेक्टिव करके उसको हम छेड़छाड़ नहीं करेंगे, ये प्रोस्पेक्टिव इफेक्ट होगा. हाँ, अगर कोई डिस्प्यूटेड है, कोर्ट में पेंडिंग है, बातचीत चल रहा है, डिस्प्यूटेड***

*है।तो ज़ाहिर सी बात है सर की कोर्ट का अधिकार को तो हम यह खत्म नहीं कर सकता है। तो इसीलिए Unless the property is disputed, all those land, those property, waqf property which are  registered which has a proper documentation, they will remain so और इसका अधिकार राज्य सरकारों का है। land is a state subject तो भारत सरकार केंद्र सरकार तो कुछ कर नहीं सकता है, वो राज्य सरकार को ही अथॉरिटी दिया है।*

वक्फ सुधारणा विधेयक आणून सरकार समाजात विभाजन करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप काँग्रेस खासदार सय्यद नासेर हुसैन यांनी केला. हे विधेयक चुकीच्या माहितीच्या आधारे बनवलं गेल्याचं हुसैन म्हणाले. संयुक्त संसदीय समितीत बहुसंख्य सदस्यांनी विधेयकाला विरोध केला होता. त्यामुळे सरकारन वक्फशी संबंध नसणाऱ्या लोकांना समितीत चर्चेसाठी बोलावलं गेलं असा आरोपही त्यांनी सरकारवर केला.दरम्यान, भाजपचे डॉ.जे.पी.नड्डा राज्यसभेत या चर्चेत सहभागी झाले असून त्यांनी हे विधेयक कुठल्याही पक्षाची किंवा मतपेढी नसून हे विधेयक संपत्तीचे व्यवस्थापन आणि राष्ट्रहीताकरीता असल्याच त्यांनी स्पष्ट केल आहे.

आयात शुल्क

अमेरिकेत भारतातून आयात होणाऱ्या मालावर २६ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे.  भारतात अमेरिकी मालावर लावल्या जाणाऱ्या शुल्काचं प्रत्युत्तर म्हणून हे शुल्क आकारण्यात येणार असल्याचं त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. जशास तसे या सिद्धांतावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं प्रति आयात शुल्क धोरण आधारित आहे. म्हणजेच अमेरिकेच्या उत्पादनावर  जे देश जितकं आयात शुल्क लावतात तितकंच शुल्क अमेरिका या देशांच्या वस्तूंवर लावेल अशा प्रकारचं  धोरण ट्रम्प यांनी आखलं आहे. युरोपियन महासंघाकडून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर वीस टक्के तर ब्रिटनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर दहा टक्के इतकं शुल्क लावण्यात आलं आहे. चीनवर ३४ टक्के, बांगलादेशवर आणि पाकिस्तानवर ३७, श्रीलंकेवर ४४, तर इस्राईलवर १७ टक्के आयात शुल्क लावण्यात आलं आहे. दरम्यान, अमेरिकेनं प्रति आयात शुल्क लादल्याचे पडसाद आज शेअर बाजारात उमटले. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ८०० अंकांनी कोसळला तर राष्ट्रीय शेअर बाजारच्या निफ्टीतही १८० अंकांची घसरण झाली.

तर केंद्रीय वाणिज्य विभाग भारतीय उद्योग आणि निर्यातदारांसह सर्व हितधारकांच्या संपर्कात असून या शुल्काचे मूल्यमापन आणि परिस्थितीचा आढावा याबाबत अभिप्राय जाणून घेत आहे. अमेरिकेच्या व्यापार धोरणामधील नवीन घडामोडीमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य संधींचे देखील हा विभाग अध्ययन करत असल्याचे केंद्रीय वाणिज्य आणि उदयोग मंत्रालयाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

बावनकुळे

शेतकऱ्याला शेतापर्यंत पोचण्यासह कृषी यंत्रसामग्री सहज वाहून नेता आली पाहिजे. यासाठी राज्य सरकारन 'मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते योजना' प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय आज प्रसिद्ध करण्यात आला आहे.राज्यातील शेतकरी, घरकुल लाभार्थी आणि शासकीय बांधकामांसाठी शेततळी, पाझर तलाव, महसूली नाले आणि बंधाऱ्यांमधून निघणारा गाळ, माती, मुरूम आणि दगड विनामूल्य मिळणार आहे. या निर्णयामुळे शेतरस्ते सुधारण्यासाठी लागणारा मुरूम आणि माती शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होईल, ज्यामुळ शेतीला जोडणारे रस्ते मजबूत होतील. दरम्यान येत्या १ मे पासून 'फेसलेस नोंदणी', 'मुद्रांक नोंदणी' आणि 'वन स्टेट, वन रजिस्ट्रेशन' प्रणाली लागू होणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुंबईत माध्यमांशी बोलताना दिली. आता नागपूरमध्ये घर घेत असाल, तरी पुण्याहूनही तुम्ही रजिस्ट्रेशन करू शकता. आधार कार्ड आणि इनकम टॅक्स प्रमाणपत्राच्या आधारे तुमचा चेहरा नोंदणीसाठी वापरण्याची सुविधा मिळणार आहे. असे सांगून या निर्णयामुळे भ्रष्टाचार कमी होईल, नागरिकांचा वेळ वाचेल आणि डिजिटल प्रक्रियेमुळे महसूल व्यवहार अधिक पारदर्शक होतील असे बावनकुळे यांनि स्पष्ट केले.

रामटेक रोपवे

नागपूर जिल्ह्यातील रामटेक गड मंदिरात ६३५ मीटर लांबीच्या रोपवेच्या विकास, संचालन आणि देखभालीसाठी १५१ पूर्णांक ५० कोटी रुपयांच्या निधीसह मंजुरी देण्यात आल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी समाजमाध्यमांवरुन दिली आहे. रामटेक हे महाराष्ट्रातील एक प्रमुख धार्मिक स्थळ आहे, जिथे भगवान श्रीराम वनवासात असताना त्यांचे वास्तव्य राहिले आहे. दरवर्षी सुमारे ८ लाख यात्रेकरू रामटेक गड मंदिराला भेट देतात आणि कार पार्किंगपासून १२० पायऱ्या किंवा टेकडीच्या तळापासून मंदिराच्या मागील

बाजूस ७०० पायऱ्या चढून दोन वेगवेगळ्या मार्गांनी मंदिरात पोहोचू शकतात.सदर रोपवे प्रकल्प मोनोकेबल फिक्स्ड ग्रिप जिग बॅक तंत्रज्ञानाचा वापर करून उभारला जाईल, ज्यामध्ये दररोज ७,२०० प्रवाशांना सेवा देण्याची क्षमता असेल. या प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ सुमारे ३-४ मिनिटांपर्यंत कमी होईल. तसच रोपवे प्रकल्प विकासामुळे परिसरातील आर्थिक आणि पर्यटन क्रियाकलापांना चालना मिळेल, अस गडकरी यांनी  सांगितल आहे.

हवामान- पाऊस

हवामान विभागान पुढील  काही तासात  नागपूर, भंडारा, गोंदीया, गडचिरोली आणि वाशिम येथे विजेच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तविली आहे. आज सकाळपासुन नागपुरात अवकाळी पावसान हजेरी लावली आहे. मंगळवार मध्यरात्री आणि बुधवारी दुपारी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शहरात अनेक ठिकाणी झाडांची पडझड झाली. याचा फटका वीज वितरण व्यवस्थेला अधिक बसला आहे. दुपारनंतर पावसाने जोर पकडला असून, शहराच्या अनेक भागात जोरदार पाऊस सुरू आहे. पाऊस सुरू असल्यामुळे नागरिकांना रेनकोट आणि छत्रीचा वापर करावा लागतोय.  अवकाळी पावसामुळे नागपुरातील मोठी बाजारपेठ असलेल्या कळमना मार्केट मध्ये असलेले धान्य देखील ओले झालेले आहे. भंडारा जिल्ह्यात वीज पडून दोन मजुरांचा मृत्यू झाला आहे. आज सकाळपासुन जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली आहे. तुमसर तालुक्यातील पाथरी येथील  मनीषा पुष्पतोडे  आणि प्रमोद नागपुरे  शेतावर काम करत होते. इतक्यात वादळी वाऱ्यासह पावसाची सुरुवात झाली आणि विजेचा कडकडाट झाला. यात विज पडून दोघांचा शेतामध्येच मृत्यू झाला आहे.

वीज जोडणी

महावितरणच्या नागपूर परिमंडलाद्वारे मागील आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये तब्बल 71 हजार 233 नवीन लघुदाब वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.यापैकी 57 हजार 858 घरगुती, 8 हजार 907 वाणिज्यिक, 1 हजार 23 औद्योगिक आणि 1 हजार 556 कृषी जोडण्यांचा समावेश आहे. यामध्ये इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशनसाठीही 65 नवीन जोडण्या देण्यात आल्या आहेत. याशिवाय, 59 पोल्ट्री, 12 पॉवरलुम, 10 शितगृह, 413 सार्वजनिक सेवा, 128 सार्वजनिक पाणी पुरवठा, 154 पथदिवे आणि 1 हजार 48 तात्पुरत्या वीज

जोडण्या दिल्या असल्याची माहिती  नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी दिली आहे.

तिकीट तपासणी

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने तिकीट तपासणी मोहिमांमध्ये आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये 28 कोटी 16 लाख 33 हजार 663 इतके विक्रमी उत्पन्न मिळवले आहे. ही उपलब्धी तिकीटविना आणि अनियमित प्रवासावर कठोर नियंत्रण आणि अंमलबजावणीच्या उपाययोजनांमुळे शक्य झाली आहे.

******